जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे ग्रामीण

P.R.O. Office, Thane Rural

Phone No. 022-25343567 Mob No. 9923441131
Address – S.P.Office, Thane Rural, Kharkar Ali,
Court Naka, Thane West
E-mail : sp.thane.r@mahapollice.gov.in

प्रेसनोट क्र. ६, दिनांक : २५/०२/२०२१

दिवंगत पोलीस अंमलदार यांच्या कुटूंबियांना ठाणे ग्रामीण पोलीस दलात अनुकंपा तत्वावर पोलीस शिपाई या पदावर मा.पोलीस महासंचालक यांच्या हस्ते नियुक्तीपत्र दिलेबाबत..

दिनांक २३, फेब्रुवारी, २०२१ रोजी कोकण परिक्षेत्र व पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने, मा.श्री.हेमंत नगराळे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या हस्ते कोरोना कालावधीमध्ये व त्यापुर्वी पोलीस कर्तव्यावर निधन झालेल्या पोलीस अंमलदाराच्या पोलीस पाल्य यांना ठाणे ग्रामीण पोलीस दलात अनुकंपा तत्वावर नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.

सदरची प्रक्रिया ठाणे ग्रामीण पोलीस दलाकडुन अतिशय जलद गतीने २१ दिवसात पुर्ण करुन, दिवंगत पोलीस अंमलदार यांच्या कुटूंबातील पुरुष - २०, स्त्री – ०३ असे एकुण २३ पोलीस पाल्य यांना ठाणे ग्रामीण पोलीस दलात नवप्रविष्ठ पोलीस शिपाई म्हणुन समाविष्ठ करण्यात येऊन त्यांना गौरविण्यात आलेले आहे. ठाणे ग्रामीण जिल्हयात प्रथमच एवढया मोठया संख्येने अनुकंपा तत्वावर भरती करण्यात आली आहे. यावेळी नवनियुक्त पोलीस अंमलदार हे कारोना कालावधी सारख्या अडचणीच्या वेळी पोलीस प्रशासनाने केलेली मदत व पालकांच्या जागी केलेल्या नियुक्तीमुळे भारावुन गेले आहेत. कोरोना काळात कार्यरत असलेले पोलीस अंमलदार यांच्या स्मृती जागवून अत्यंत कमी कालावधीमध्ये नियुक्तीपत्र देण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे.

सदरची प्रक्रिया श्री.विक्रम देशमाने, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, श्रीमती स्मिता पाटील, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली श्री.धरमपाल बनसोडे, पोलीस उपअधीक्षक (गृह), ठाणे ग्रामीण, श्री.राजेंद्र कत्तुल, राखीव पोलीस निरीक्षक, श्री.प्रकाश मोकल, राखीव पोलीस उप-निरीक्षक, वरिष्ठ लिपीक श्री.म्हात्रे यांनी केली आहे.

****